जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 OCT 2021 पुढारी

शिवाजी विद्यापीठास नावलौकिक मिळवून देऊ

वर्षपूर्तीनिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा मानस

कोल्हापूर : प्रवीण मस्के

कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर कोरोना व महापुराचे संकट आले. त्यातही सर्वांना बरोबर घेऊन विद्यापीठ प्रशासनाचा गाडा चांगल्या पद्धतीने सुरू आहे. 'मिशन नॅक २०२६' सुरू झाले आहे. पाच वर्षांत राज्यातील सर्वात मोठे विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठास नावलौकिक मिळवून देण्याचा प्रयत्न राहील, असा मानस शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी व्यक्त केला.

डॉ. शिर्के यांनी कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारून एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्याशी संवाद साधला. डॉ. शिर्के म्हणाले, कोरोना काळात विद्यापीठाने नवीन परीक्षा प्रणाली विकसित केली. शिक्षक, विद्यार्थी अशा परीक्षेला पहिल्यांदाच सामोरे



गेले. अधिकारी, कर्मचाऱ्यांना आत्मविश्वास दिल्याने परीक्षा विभागाच्या टीमने एकसंघपणे काम केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नाही. ऑनलाईन परीक्षा सुरळीतपणे झाल्या. त्याची परंपरा आजही सुरू आहे.

विद्यापीठाने काही नवीन प्रकल्प सुरू केले आहेत. सीमा भागात शिणोली येथे विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क न घेता कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम सुरू केले. दूरशिक्षणसाठी ऑनलाईनला पात्र झालो असून एम.बी.ए., एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, मॅथ्स, एम.कॉम. हे अभ्यासक्रम ऑनलाईन झाले आहेत. राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावरील संग्रहालयाचे काम पूर्णत्वास आले आहे. या भागातील मोजके विरगळ आणून त्याचे खुले संग्रहालय उभारले जाणार आहे.

वाणिज्य विभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, भगवान महावीर अभ्यास केंद्राच्या नवीन इमारतीचे काम लवकरच काम सुरू होणार आहे. सध्या मिशन ऑलिम्पिकसाठी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. २०२६ नॅकचे काम सुरू केले असून, समित्या नेमल्या आहेत. कोरोनातही विद्यापीठातील संशोधनावर कोणतीही बंधने घातली नाहीत. संशोधनाचा झेंडा अटकेपार गेला असून, ४७ संशोधक टॉप शास्त्रज्ञांच्या यादीत आहेत.कोव्हिडमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक कल्याण निधी स्थापन केला. आतापर्यंत ५० लाखांहून अधिक निधीचे वाटप झाले आहे.

काही अधिविभागांना स्वायत्तता देणार

यावर्षी महावीर कॉलेज, डी.वाय.पाटील अभियांत्रिकी कॉलेज, कॉमर्स कॉलेज, तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्तता मिळाली आहे. महाविद्यालये सोडून अधिविभागांना स्वायत्तता देण्याचे ठरविले आहे. या शैक्षणिक वर्षात काही अधिविभागांना स्वायत्तता दिली जाणार आहे. यानिमित्ताने स्वतंत्रपणे काम करण्याची संधी मिळणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले.

नवीन वसतिगृहाची लवकरच उभारणी

कोल्हापूर, सांगली, सातारा येथील विद्यार्थिनी विद्यापीठात शिकतात. त्यांच्यासाठी वसतिगृहे अपुरी पडत आहेत. यासाठी पालकमंत्री सतेज पाटील यांच्याकडे ८ कोटी रुपये मागितले आहेत. तिन्ही जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन डीपीडीसीमधून निधी देण्याची मागणी केली आहे. हा निधी उपलब्ध झाल्यास लवकरच नवीन वसतिगृह उभारले जाईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

07 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संशोधन विकास अन् राज्यात नंबर वन विद्यापीठ

कोरोनाच्या कालावधीत विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा घेणे विद्यापीठासमोर मोठे आव्हान होते. तरीही एकसंधपणे काम करीत ऑनलाईन परीक्षा व निकाल वेळेत पूर्ण केले. सर्वांना सोबत घेऊन नॅक मुल्यांकनात पुढील मानांकन मिळवून २०२६ ला राज्यातील सर्वात मोठे विद्यापीठ म्हणून नावलौकिक मिळवून देण्याचा संकल्प आहे. संशोधनातही जागतिक पातळीवरचे मानांकन मिळवल्याने देश नव्हे तर जगाच्या नकाशात शिवाजी विद्यापीठाचे नाव कोरले, अशा भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदाच्या वर्षपूर्तीनंतर 'तरुण भारत'ने त्यांच्याशी संवाद साधला.

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रश्न : कोरोनात कमी मनुष्यबळामध्ये प्रवेश, परीक्षा, निकाल ही आव्हाने कशी पेलली?

कुलगुरू डॉ. शिर्के: शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा कार्यभार स्वीकारला. अन ऑनलाईन परीक्षेचा निर्णय सरकारने जाहीर केला. तांत्रिक मुनष्यबळ, आवश्यक प्रणाली नसल्याने परीक्षा कशा घ्यायच्या मोठा प्रश्न होता. सर्व अधिकार मंडळांच्या परवानगीने ऑनलाईन प्रणाली विकसीत केली. किरकोळ तांत्रिक अडचणी सोडल्या तर परीक्षा, निकाल वेळेत पूर्ण केल्याचे समाधान आहे.

प्रश्न : अपेक्षित गोष्टी प्रत्यक्ष कुलगुरू म्हणून कशा सोडवत आहात?

कुलगुरू डॉ. शिर्के: गेली ३५ वर्षे विविध् अधिकार मंडळावर काम केल्याने, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना न्याय

देण्याचा प्रयत्न केला. कुलगुरू म्हणून पहिलाच दीक्षांत समारंभ ऑनलाईन घेऊन विद्यार्थ्यांना स्पीड पोस्टाने पदवी प्रमाणपत्रे पाठवली. उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांनी आयोजित 'मंत्रालय आपल्या दारी' उपक्रमात ९०० तक्रारी ऑनलाईन घेऊन सोडवल्या.

प्रश्न : ऑनलाईनची आव्हाने पेलत समाजाशी नाळ कशी जोडली?

- **शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या वर्षपूर्तीनंतरचे नवसंकल्प**
- **कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी 'तरुण भारत'ने साधला संवाद**

कुलगुरू डॉ. शिर्के: विद्यापीठात कोरोना केअर सेंटरची स्थापना केली. 'माझं गाव, कोरोनामुक्त गाव" ही संकल्पना राबवली. महापुरात शहरातील लोकांना पाणी अन् जनावरांना चारा दिला. सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करून मोफत मार्गदर्शन दिले जात आहे. कोरोनामुळे ज्या विद्यार्थ्यांच्या आई-वडीलांचा मृत्यू झाला अशा विद्यार्थ्यांना ५० लाख रुपयांचे वाटप केले.

प्रश्न : लॉकडाऊनमध्ये संशोधन कशा पद्धतीने सुरू होते?

कुलगुरू डॉ. शिर्के: कोरोनाशी निगडीत व इतर संशोधनासाठी सुविधा पुरविल्या. त्यामुळे विद्यापीठातील ४७ संशोधकांनी संशोधनाचा झेंडा अटकेपार लावला. जिल्हा नियोजन समितीकडून १ कोटी ३४ लाखाचा निधी रेशीम उद्योग विभागासाठी मिळाला. हवामान बदल व शाश्वत विकास नवीन सेंटर सुरु केले. भूकंप मापन तीन वर्षापासून बंद होते ते कार्यान्वित केले.

प्रश्न : कुलगुरू म्हणून भविष्यातील संकल्प?

कुलगुरू डॉ. शिर्के: युजीसीच्या नियमानुसार दूरशिक्षण विभाग ऑनलाईनसाठी पात्र झाला आहे. भविष्यात एमबीए, एमएस्सी कॉम्प्युटर सायन्स, एम. एस्सी. मॅथस, एम. कॉम अभ्यासक्रम ऑनलाईन होणार आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्युझियम परिसरात वीरगळ, शिलालेखांचे खुले संग्रहालय सुरू करणार आहे. २०२३ ला एनआयआरएफ मानांकनात निश्चित बदल झालेला दिसेल.

07 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोरोनाशी लढत गुणवत्तावाढ, संशोधनात वाटचाल

डी. टी. शिर्के : तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थिभिमुख सुविधा वाढविण्यावर भर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनाच्या बिकट स्थितीतच कुलगुरूपदाची कारकीर्द सुरू झाली. शिक्षण, परीक्षा प्रक्रियेत आव्हाने समोर होती. विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकार मंडळातील सदस्य आणि समाजाच्या पाठबळावर या आव्हानांचा सामना करत 'नॅक'च्या माध्यमातून गुणवत्ता वाढीसह नवसंशोधन, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन सुविधांची निर्मिती अशी पावले टाकल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी सांगितले. प्रशासनात तंत्रज्ञानाचा वापर वाढवून त्याव्दारे विद्यार्थिभिमुख सुविधा वाढविण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरूपदाच्या वर्षपूर्तीबद्दल डॉ. शिर्के यांनी 'लोकमत'शी संवाद साधला. कोरोनाच्या कालावधीत ऑनलाईन परीक्षेची प्रणाली विद्यापीठाची नव्हती. शिक्षक, विद्यार्थ्यांना अनुभव नव्हता. त्यावर कोणतीही गडबड केली नाही. योग्य नियोजन करून चांगल्या पद्धतीने परीक्षा घेऊन राज्यात विद्यापीठाचे परीक्षांबाबत एक मॉडेल तयार केले. विविध प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया ऑनलाईन करून विद्यार्थी सुविधा केंद्र अद्ययावत केले. पुढील टप्प्यात शिष्यवृत्ती, महाविद्यालय-विद्यापीठ संलग्नता, ई-फायलिंग केले जाईल. विद्यापीठाच्या प्रत्येक घटकावर जबाबदारी देत त्यांचा आत्मविश्वास वाढवून 'नॅक'चे 'ए-प्लस प्लस' या मानांकनाचे यश खेचून आणले. या मानांकनात वाढ करण्यासाठी कृती आराखडा ठरवून काम सुरू केले असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. कोरोना, महापुराच्या आपत्तीवेळी गरजूंना मदतीचा हात देत विद्यापीठाची सामाजिक बांधीलकी वाढवली.

गेल्या वर्षभरात काही आपत्ती, विविध अपघातांमध्ये जीव गमावलेले विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १११ विद्यार्थी, पालकांच्या कुटुंबीयांना ९० लाखांची मदत केली. समाजोपयोगी संशोधनाची पावले टाकली. त्याद्वारे डीबीटी बिल्डर, डीएसटी पर्स, युरोपियन एज्युकेशन, गूळ संशोधन, जिल्हा नियोजन समिती आदींच्या माध्यमातून वर्षभरात सुमारे २० कोटींचा संशोधन निधी मिळवला असल्याचे त्यांनी सांगितले.

वर्षभरातील ठळक कामगिरी

- 'नॅक'चे ए प्लस प्लस मानांकन
- हवामान बदल आणि शाश्वत विकास अभ्यासकेंद्र, राजर्षी शाहू लोकविद्या लोकसंस्कृती केंद्राची स्थापना
- भूजल सर्वेक्षणाबाबत पाच हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण
- ऑनलाईन युवा महोत्सव, सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी शिनोळी येथील केंद्रात कौशल्य अभ्यासक्रमांची सुरुवात
- ८५ प्राध्यापक, ३२ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नती
- ई-कंटेट निर्मितीसाठी २० लाखांच्या आधुनिक साहित्यासह अद्ययावत स्टुडिओची निर्मिती
- एमबीए, एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, एम. कॉम, एम. एस्सी. मॅथेमिटिक्स या नव्या ऑनलाईन अभ्यासक्रमांची सुरुवात

"कुलगुरूपदाच्या वर्षपूर्तीचा आनंद आहे; पण अजून मला खूप काम करायचे आहे. विद्यापीठ विकासासाठीच्या कृती आराखड्यातील ३० टक्के काम झाले आहे. या आराखड्यातील सर्व योजना तीन वर्षांत सुरू करून त्यांची अंमलबजावणी योग्य होण्यासाठी दोन वर्षांत संस्थात्मक यंत्रणा उभी करणार आहे. विनाकारण ढीगभर योजना जाहीर करणार नाही. नेमके काम अधिक प्रभावीपणे करून विद्यापीठाची ओळख अधिक ठळक करणार आहे.

- कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के

भविष्यातील नियोजन...

- २०२३ मध्ये 'एनआयआरएफ' रँकिंगमध्ये वाढ
- राजर्षी शाहू जीवनकार्य संग्रहालय व छत्रपती संभाजी महाराज अभ्यासकेंद्र सुरू करणे, शीलालेख, वीरगळांचा समावेश असलेले खुले संग्रहालयाची उभारणी
- महावीर अध्यासन, वाणिज्य अधिविभागाला स्वतंत्र इमारत आणि विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या वसतिगृहाची क्षमता वाढविणे

- ग्रंथालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या केंद्रातील सुविधा वाढविणे.
- रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, अर्थशास्त्र या अधिविभागांना स्वायत्ता देणे.
- एमपीएससी पूर्व परीक्षेतील येथील टॉप ५० विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्राची उभारणी
- क्रांतिवन सुशोभीकरण आणि टेबल टेनिस, बॅडमिंटन कोर्ट, शूटिंग रेंज, वेटलिफ्टिंगची सुविधा असणारे अद्ययावत क्रीडा संकुल साकारणे

07 OCT 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपूर्ण विद्यार्थी घडवण्यासाठी शिक्षण प्रणाली

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के : कुलगुरुपदाच्या वर्षपूर्तीबद्दल विशेष मुलाखत

कोल्हापूर : विजय पाटील

बदलत्या काळाचा वेध घेऊन अभ्यासक्रम लवचिक ठेवण्याचे धोरण आखले आहे. कोरोनानंतर संपूर्ण जग बदलले आहे. शिक्षण व्यवस्थेवर याचे दूरगामी परिणाम दिसत आहेत. या सर्वांचा विचार करून ऑनलाईन शिक्षणावर भर देत नवनवे अभ्यासक्रम व कौशल्याधारित उपक्रम सुरू केले आहेत. परिपूर्ण विद्यार्थी घडवण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने शिक्षणप्रणाली आखली असल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी दैनिक 'पुण्यनगरी'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत दिली.

शिर्के यांनी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या घटनेस गुरुवारी (दि. ७) वर्षपूर्ती झाली. यानिमित्ताने कुलगुरू प्रा. डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाचे व्हिजन मुलाखतीच्या माध्यमातून मांडले.

कोरोनानंतर ऑनलाईन आणि पेपरलेस हे शब्द शिक्षण क्षेत्रात परवलीचे बनले आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने याबाबत काही पावले उचलली आहेत काय? या प्रश्नावर कुलगुरू प्रा. शिर्के म्हणाले, आम्ही वर्षभरात आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय वेबिनार घेतली आहेत. प्रशासकीय कामकाजसुद्धा ऑनलाईनच्या माध्यमातून चालवले. काळाची गरज ओळखून ई-कंटेंट डेव्हलप केला आहे. स्थानिकांसह जगभरातल्या विद्यार्थ्यांसाठी एमएस्सी (मॅथ्स), एमएस्सी (कॉम्प्युटर सायन्स), एमबीए, एम.कॉम. या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना पर्यायी ऑनलाईन केले आहे.

रोजगाराभिमुख शिक्षणाबाबत कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रात अडीच लाख विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेतात. 'रेडी टू जॉब' या संकल्पनेने विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये विविध कौशल्ये शिकवण्याच्या संधी निर्माण केल्या आहेत. कोरिया देशातील एका शहराच्या स्थानिक प्रशासनासमवेत आम्ही माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणार आहोत. यातून रोजगाराच्या संधीचे नवे दालन निर्माण होणार आहे, असे अनेक उपक्रम सुरू आहेत.

१ कोटी अर्थसाहाय्यातून दु:खावर फुंकर

विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर अशा सर्वांसाठी कल्याण निधी उभा केला आहे. दुर्दैवाने जैविक हानी झाली तर वारसांना आम्ही दीड लाख रुपयांची मदत तत्काळ देतो. या दुर्दैवी घटनेनंतर किमान भरपाई म्हणून आर्थिक मदत दिली जाते. गेल्या सहा महिन्यांत १११ प्रकरणांमध्ये १ कोटी रुपयांचे असे अर्थसाहाय्य देत संबंधितांच्या दु:खावर फुंकर घालण्याचा प्रयत्न केला असल्याचे कुलगुरू शिर्के यांनी सांगितले.

मिशन ऑलिम्पिक

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी हे गुणवंत खेळाडू म्हणून ओळखले जातात. त्यामुळे आम्ही मिशन ऑलिम्पिक असे ध्येय ठेवत क्रीडा प्रकारांना सुविधा पुरवल्या आहेत. यंदा ५० लाख रुपयांची बजेटमध्ये तरतूद केली असल्याचे कुलगुरू प्रा. डॉ. शिर्के यांनी एका प्रश्नावर बोलताना सांगितले.

कोरोनाच्या काळाबाबत ते म्हणाले, या संकटाच्या काळात प्रतिकूल स्थिती असतानाही आम्ही ऑनलाईन परीक्षा घेऊन त्या यशस्वी केल्या. विद्यार्थ्यांना पदवीची प्रशस्तिपत्रकेसुद्धा घरपोच केली. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी याबाबत मोलाचे परिश्रम घेतले. वर्षभराच्या काळात संशोधन अटकेपार पोहोचवण्यात यशस्वी झालो. संशोधनासाठी २० कोटी इतका निधी उभारता आला. गुळासह युरोपियन युनियनशी ४.० या रोजगाराच्या संधी उपलब्ध करणाऱ्या प्रोजेक्टच्या माध्यमातून संशोधन सुरू असल्याचेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्पष्ट केले. राजर्षी शाहू लोकविद्या, लोकसंस्कृती केंद्र, हवामान बदल व शाश्वत विकास केंद्र यांची उभारणी करण्यात आली. छत्रपती राजर्षी शाहू म्युझियमचे काम पूर्णत्वाकडे आहे. शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस पर्यटन केंद्र बनवण्यासाठी नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

सकाळ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे अभिनंदन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एम. एस. देशमुख आदी.

शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च फाउंडेशन अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळांतर्गत स्थापन केलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन' कंपनीच्या (सेक्शन-८) अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड झाली. कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक विद्यापीठ कार्यालयात झाली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची एकमताने निवड झाली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन अध्यक्षांचे अभिनंदन आणि स्वागत केले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

07 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'नॅक'च्या यशाने वर्षपूर्तीचा आनंद

डॉ. डी. टी. शिर्के यांची कुलगुरूपदी निवड होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने त्यांच्याशी साधलेला संवाद.

डॉ. डी. टी. शिर्के

प्रश्न : एका वर्षातील उपलब्धी आणि आलेली आव्हाने याबद्दल काय सांगाल?

डॉ. शिर्के : कुलगुरूपदाची सूत्रे हाती घेताच कोरोनाचा सामना करावा लागला. ऑनलाईन परीक्षा घेणे, निकाल लावणे हे आव्हान होते. मात्र पारदर्शक आणि अडथळ्याविना या परीक्षा घेतल्या. त्यामुळे ऑनलाईन परीक्षेचा 'शिवाजी विद्यापीठ पॅटर्न' तयार झाला. दीक्षान्त समारंभही ऑनलाईन झाला. नॅक समितीचे मूल्यांकन हे दुसरे आव्हान होते. नॅकची तयारी करताना सर्व घटकांशी प्रत्यक्ष बोलून या मूल्यांकनासाठी त्यांची सकारात्मक मानसिकता बनवली. विद्यापीठाला ऐतिहासिक ए प्लस प्लस मानांकन मिळाले. या यशामुळे वर्षपूर्तीचा आनंद झाला. आता एन.आय.आर.एफच्या मूल्यांकनाची तयारीही सातत्याने सुरू आहे. पुढील काही वर्षात निश्चितच त्याचे चांगले परिणाम दिसतील.

प्रश्न : कोरोना काळातील आव्हाने काय होती, त्यावर कशी मात केली?

डॉ. शिर्के : विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना १५ टक्के उपस्थितीची मर्यादा होती. ऑनलाईन अध्यापन आणि अध्यापनाची सवय कोणालाच नव्हती. वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करून ऑनलाईन परीक्षा घेणे व निकाल लावणे. शक्य तेवढी मदत प्रशासनाला करणे ही आव्हाने होती. कोरोना काळात विद्यापीठाची वसतिगृहे कोविड सेंटर म्हणून उपयोगात आणली. सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने या आव्हानांना यशस्वीपणे सामोरे गेलो. यापुढेही प्रशासकीय कामे गतीने होण्यासाठी ऑनलाईन यंत्रणेचा वापर वाढवणार आहे. प्रवेश, निकाल, शैक्षणिक शुल्क, पदवी प्रमाणपत्रे या सर्व गोष्टी ऑनलाईन करण्यासाठी गतीने प्रयत्न सुरू आहेत. एम.बी.ए, एम.कॉम, एम.एस.सी (गणित) हे अभ्यासक्रमही ऑनलाईन सुरू होणार आहेत. कार्यक्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांचे पालक कोरोनामुळे मृत झाले त्यांना ७५ हजार रुपये, तर विद्यार्थी मृत झाला असेल तर त्याच्या परिवाराला दीड लाखाची मदत दिली. सुमारे १११ जणांना ९० लाखांची मदत केली गेली.

प्रश्न : विद्यापीठातील संशोधनाला गती देण्यासाठी कशा प्रकारे नियोजन केले?

डॉ. शिर्के : राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या संशोधनामध्ये विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांचा सहभाग आहे. ही शैक्षणिक क्षेत्रातील विद्यापीठाची वेगळी ओळख आहे. डी. बी. टी बिल्डर, डी. एस. टी. युरोपियन युनियन, महाराष्ट्र इनोव्हेटीव्ह सोसायटी अशा विविध माध्यमातून संशोधनासाठी सुमारे २० कोटींचा निधी दिला. जिल्हा नियोजन समितीतूनही स्वाइल टू सिल्कसाठी निधी मिळाला. सध्या विद्यापीठात २१ मानद प्राध्यापक असून ४ संशोधक प्राध्यापक आहेत. त्यांचे मार्गदर्शन संशोधकांना मिळते. संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली.

प्रश्न : वर्षभराच्या काळात कोणते नवीन उपक्रम, योजना कार्यान्वित झाल्या.

डॉ. शिर्के : सेंटर फॉर क्लायमेट चेंज ॲण्ड सस्टिनेबल स्टडीज, राजर्षी शाहू लोक विद्या व लोकसंस्कृती, छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र, शाहू जीवनकार्य प्रदर्शनी यांसारखी लोकोपयोगी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यातील काही केंद्र सुरू झाली असून उर्वरित नजीकच्या काळात सुरू होतील. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केले असून नजीकच्या काळात येथे प्रिलियम उत्तीर्ण झालेल्यांना पुढील मार्गदर्शन मोफत केले जाणार आहे. जे उद्दिष्ट ठेवले त्यातील ३५ टक्के पूर्ण करू शकलो. पुढील दोन वर्षात शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण होईल.

लोकसत्ता

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन'च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली असल्याचे बुधवारी सांगण्यात आले. शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत ही कंपनी स्थापन करण्यात आली असून कंपनीच्या संचालक मंडळाची पहिल्या बैठकीत ही एकमताने निवड करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे स्वागत करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

पुढारी

शिवाजी विद्यापीठ रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. शिर्के

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक मंगळवारी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे अभिनंदन व स्वागत करण्यात आले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम.एस. देशमुख आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

'रिसर्च डेव्हलपमेंट' च्या अध्यक्षपदी कुलगुरू शिर्के

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत स्थापन केलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड केली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवारी विद्यापीठ कार्यालयात झाली. या बैठकीमध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे अभिनंदन व स्वागत करण्यात आले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

सकाळ

कोल्हापूर : युरोपियन युनियन इरॅस्मस प्लस प्रकल्प व्यवस्थापकांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. व्ही. एस. खंडागळे आदी.

'युरोपियन युनियन इरॅस्मस' प्रकल्पाला चालना

व्यवस्थापकांची शिवाजी विद्यापीठाला भेट

कोल्हापूर, ता. ६ : युरोपियन युनियन इरॅस्मस प्लस प्रकल्पाच्या अनुषंगाने संबंधित प्रकल्प व्यवस्थापकांनी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन पाहणी केली. युरोपियन युनियनच्या इरॅस्मस प्लसने अर्थसहाय्य केलेल्या, 'मिटिगेट द इम्पॅक्ट ऑफ फोर्थ इंडस्ट्रियल रिव्हॅल्युशन ऑन इंडियन सोसायटी : एज्युकेशन रिफॉर्म फॉर फ्युचर अँड इन सर्व्हिस स्कूल टीचर्स' प्रकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग काम करीत आहे. या अंतर्गत विभागाला एक कोटी सव्वीस लाखांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. या प्रकल्पाविषयक अधिक माहिती देण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती अल्डा टॉलुमी आणि श्रीमती सिलिया ग्वाटेमेलो यांनी भेट दिली. त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचीही भेट घेतली. विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी स्वागत केले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. व्ही. एस. खंडागळे, उपकुलसचिव श्रीमती अडसुळे, सरस्वती कांबळे, सोनाली कोळी आदी उपस्थित होते. इनोव्हेशन व्यवस्थापक गीतांजली जोशी यांनी आभार मानले.

07 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'शिक्षणशास्त्र'ला मिळणार सव्वा कोटी रुपये

युरोपियन युनियनच्या इरॅस्मस प्लस प्रोग्रॅममधून अर्थसाहाय्य : व्यवस्थापकांची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : युरोपियन युनियन इरॅस्मस प्लस प्रकल्पाच्या अनुषंगाने संबंधित प्रकल्प व्यवस्थापकांनी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन पाहणी केली. इरॅस्मस प्लसने अर्थसाहाय्य केलेल्या 'मिटिगेट द इम्पॅक्ट ऑफ फोर्थ इंडस्ट्रियल रिव्हॉल्युशन ऑन इंडियन सोसायटी : एज्युकेशन रिफॉर्म फॉर फ्युचर अँड इन सर्व्हिस स्कूल टीचर्स' या प्रकल्पामध्ये विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग काम करत आहे. या अंतर्गत विभागाला एक कोटी सव्वीस लाख इतके अर्थसाहाय्य मिळणार आहे.

प्रकल्पाचे पुढील नियोजन व कार्यवाही करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक अल्डा टॉलुमी आणि सिलिया ग्वाटेमेलो यांनी सोमवारी, मंगळवारी विद्यापीठाला भेट दिली. शिक्षणशास्त्र विभागातील अध्यापक, संशोधकांशी त्यांनी चर्चा केली. या भेटीदरम्यान या व्यवस्थापकांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची भेट घेतली. त्यावेळी या प्रकल्पासाठी शिक्षणशास्त्र अधिविभागाला पूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. व्ही. एस. खंडागळे उपस्थित होते. .

पुण्यनगरी

'विवेकानंद'ला विजेतेपद

शिवाजी विद्यापीठाचा युवामहोत्सव उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित ४० व्या युवामहोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद (जनरल चॅम्पियनशिप) विवेकानंद कॉलेजने मिळवून माजी कुलगुरू अप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक पटकावला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांना चांदीचा चषक व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्ट्रार डॉ. विलास नांदिवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. या महोत्सवात १९ कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले होते. यामध्ये विवेकानंद कॉलेजने सर्वाधिक पारितोषिके मिळवली. सर्व कलाकार विद्यार्थ्यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. सर्व विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. बी. के. गोसावी, प्रा. एस. एस. अंकुशराव, प्रा. संदीप पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

07 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सहकाराशी निगडित जाणीव आवश्यक

दिनेश ओऊळकर; शिवाजी विद्यापीठात सभासद प्रशिक्षण कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : ''सहकार हा समृद्धीकडे नेणारा मार्ग असून त्याच्याशी संबंधित घटकांमध्ये त्या अनुषंगाने माहिती आणि जाणीव असणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी पणन संचालक दिनेश ओऊळकर यांनी केले. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ नवी दिल्ली, बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंग, शिवाजी विद्यापीठ आणि श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटी आजरातर्फे (मल्टी-स्टेट) यांच्या एकदिवसीय सभासद प्रशिक्षण कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

श्री. ओऊळकर म्हणाले, ''केंद्र सरकारलाही सहकाराच्या बलस्थानांची जाणीव झालेली असून त्यामुळेच प्रथमच केंद्रीय स्तरावर स्वतंत्र सहकार खाते निर्माण केले. त्याचा अनुकूल परिणाम महाराष्ट्रातील सहकारी चळवळीवर आणि संस्थांवर निश्चितपणाने होईल. महाराष्ट्रातील आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ अतिशय बळकट असून, ६० टक्के पीककर्जाचे वाटप सहकारातूनच होत असते. भांडवलावर मर्यादित लाभांश तसेच सभासदांना विविध प्रकारचे लाभ सहकारी संस्था देत असतात. या बळावरच कृषी आणि पणन हे विभागही सक्षम होण्यास हातभार लागत असतो. सभासदांना त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांची जाणीव असल्यास सहकाराची वाटचाल योग्य प्रगतीच्या दिशेने राखता येते. त्यादृष्टीने अशा प्रकारच्या कार्यशाळा आयोजित होत राहणे गरजेचे आहे.''

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सभासद प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना दिनेश ओऊळकर. शेजारी विजय हरगुडे, प्रा. डॉ. विजय ककडे, 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, महेश धर्माधिकारी.

डॉ. शिर्के यांनी सभासद प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. रवळनाथ सहकारी गृहनिर्माण संस्था उत्कृष्ट दर्जाचे कार्य करत असून बहुराज्य संस्था म्हणूनही भविष्यकाळात ती नावारुपाला येईल, अशी आशाही व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, विजय हरगुडे उपस्थिती होती. डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. प्राचार्य निळपणकर यांनी आभार मानले. महेश धर्माधिकारी, डॉ. विजय ककडे यांनी मार्गदर्शन केले.